लोकसभा सार्वत्रिक निवडणुक-2024 आदर्श आचार संहिता भंग केले प्रकरणी श्री.भगवान पांडुरंग फसले, प्राथ.शिक्षक, जि.प.प्राथ.शाळा तिरमल वस्ती (चिचोंडी) ता.पाथर्डी यांना अंतिम शिक्षा करणे बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
शिक्षण विभाग प्राथमिक
जा.क्र.कार्या-2/प्राचौ/ 347 /2024
अहमदनगर दि. 15/07/2024

वाचा:-1. तहसिलदार आचारसहिंता कक्ष,लाकसभा सार्वत्रिक निवडणुक जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील पत्र क्र.लोकसभा-24 आचारसंहिता कक्षक/कावी/82/2024 दि. 4/4/2024
2.या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस कार्या-2/प्रा.चौ/47/2024/ 1845 दिनांक 16/04/2024
3. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचेकडील चौकशी अहवाल जा.क्र.आस्था-3/ 16/2024 दिनांक 18/04/2024 व आपला खुलासा 18/04/2024
4. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस, कार्या2/खाचौ/ 280/2024/2029 दि.25/04/2024
5.गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचे पत्र आस्था 3/ 486/24 दि.22/05/2024 रोजीचे पत्रा समवेतचा श्री.भगवान पां.फसले, प्रा.शि.यांचा खुलासा

सार्वत्रिक लोकसभा निवडणुक-2024 करिता दिनांक 16/03/2024 पासुन आदर्श आचारसंहिता लागु करणेत आलेली असुन तहसीलदार आचारसंहिता कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचेकडुन दि.04/04/2024 चे पत्रान्वये श्री.भगवान पांडुरंग फसले, प्रा.शिक्षक .प.प्राथ.शाळा तिरमलवस्ती (चिचोंडी) ता.पाथर्डी यांनी आचारसहिंता कालावधीत मोहज मित्र सर्कल या व्हॉटस􀀀प गृपवर राजकीय पक्षाचे काम करण्याचे हेतुने पोष्ट प्रसारित केलेने आचारसहिंतेच्या नियमाचे भंग झालेबाबत तक्रार प्राप्त झालेली आहे असे कळविले असुन प्रकरणी नियमानुसार उचित कार्यवाही करणेबाबत निर्देशित केलेले आहे. सबब प्रकरणी आपणास दिनांक 16/04/2024 रोजी कारणे दाखवा नोटीस देवुन खुलासा सादर करणेबाबत कळविलेले आहे तसेच प्रकरणी दिनांक 15/04/2024 चे पत्रान्वये प्रकरणी गटशिक्षणाधिकारी पाथर्डी यांना चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविलेले आहे.

करिता प्रकरणी गटशिक्षणाधिकारी प.स.पाथर्डी यांनी दिनांक 18/04/2024 रोजी अहवाल सादर केला असुन प्रकरणी आपला खुलासा घेण्यात आलेला आहे. करिता आपले खुलाश्याचे व चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता आपले मोबाईलचे माध्यमातुन मुलाकडुन नजरचुकीने राजकीय संदेश फॉरवर्ड झालेला असलेबाबत आपण कबुल केलेले आहे. करिता श्री.भगवान पांडुरंग फसले, प्राथ.शिक्षक यांचे कडुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 मधील नियम 04(4) चा भंग झालेला असले कारणाने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम 1964 मधील नियम 04(2) नुसार आपली पुढील वेतनवाढ एक वर्ष कालावधीकरिता भविष्यकालिन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने थोपविणेची शिक्षा का करणेत येवु नये ? या बाबत संदर्भ क्रमांक 4 अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात येऊन अभिवेदन सादर करण्यास कळविण्यात आलेले आहे.करिता आपला क्र.5 अन्वये खुलासा सादर करण्यात आलेला आहे.

सदर खुलाशात आपण सदर प्रकरणी आपणाकडुन आदर्श आचार संहितचे उल्लघंन होईल व त्यातून मतदारांवर प्रभाव पडेल अथवा मतदार अमीषास बळी पडतील अशा स्वरुपाचा कोणताही मजकुर नाही, तसेच सदर पोस्ट मध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचे तसेच राजकीय व्यक्तीचे पुर्ण नाव नाही.सदर पोस्टमध्ये राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यातील मजकूर अथवा आश्वासन नमुद नाही.सदर पोस्टमधून कुठल्याही प्रकाराचा राजकीय प्रचार अथवा प्रसार होत नाही.त्यामुळे सदरची तक्रार मुळत: चुकीची असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु श्री.भगवान पांडुरंग फसले यांनी त्यांचे मोबाईलवरुन Mohoj

Frinds Circle या गुपवर प्रसारीत केलेली पोस्टचा आशय पाहता त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 मधील नियम 04(4) नुसार कोणताही परिषद कर्मचारी कोणत्याही विधान मंडळांच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत प्रचार करणार नाही किंवा त्यामध्ये हस्तक्षेप करणार नाही किंवा त्यासंबधी स्वत:चे वजन खर्ची घालणार नाही अशी तरतुद आहे. तसेच नियम 03 नुसार परिषद कर्मचारी सदैव निरपवाद व सचोटीने वागेल व कर्तव्य परायण राहील अशी तरतुद आहे. मात्र श्री.भगवान पांडुरंग फसले यांचेकडुन उक्त नियमाचा भंग झालेला आहे. सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम 1964 मधील नियम 04(2) नुसार श्री. भगवान पांडुरंग फसले यांना पुढील वेतनवाढ एक वर्ष कालावधीकरिता भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा स्वरुपात थोपविण्याची शिक्षा अंतिम करण्यात येत आहे.

सदर शिक्षेच्या आदेशाची नोंद श्री.भगवान पांडुरंग फसले, प्रा.शिक्षक, जि.प.प्राथ.शाळा तिरमल वस्ती,(चिचोंडी) ता.पाथर्डी यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावार उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202407151601206........... असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 15-07-2024 15:52:48
(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

श्री.भगवान पांडुरंग फसले, प्राथ.शिक्षक जि.प.प्राथ.शाळा तिरमलवस्ती (चिचोंडी) ता.पाथर्डी, जि.अहमदनगर
द्वारा व प्रत :-गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पाथर्डी
2/- सदर आदेशाची प्रत संबधीतास बजावण्यात येऊन त्याची दिनाकीत पोहच घेण्यात येऊन कार्यालयास सादर करण्यात यावी.

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर